अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 11 डिसेंबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 17 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# न.प. निवडणूकीत लाडक्या बहिणी ठरणार गेम चेंजर

## पुरूषांपेक्षा महिला मतदारांचे प्रमाण जास्त, शहरात एकूण ६७.९ टक्के मतदान

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगर पालिकेवर नगराध्यक्ष व २३ नगरसेवकांना निवडून देण्यासाठी ०२ डिसेंबर २०२५ ला मतदान प्रक्रिया पार पडली. यामध्ये एकूण ३३७७९ मतदारापैकी २२९३६ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजाविला आहे. ३६ मतदान केंद्रावर ब्रम्हपुरीतील नागरिकांनी आपला मताधिकाराचा हक्क बजाविला असून एकुण ६७.९ टक्के मतदान झाले आहे. मताधिकाराचा हक्क बजाविण्यात पुरूषांपेक्षा महिलांची संख्या अधिक आहे. त्यामुळे शहरातील लाडक्या बहिनी नगर परिषद निवडणूकीच्या निकालात 'गेमचेंजर' ठरणार आहेत.

ब्रह्मपुरी नगरपालिकेवर गेल्या एक वर्षापासून प्रशासक राज होते. ब्रम्हपुरी नगरपालिकेचे आरक्षण सोडत निघाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला. ब्रम्हपुरी नगर पालिकेत नगराध्यक्ष पद ओबीसी प्रवर्गाकरीता राखीव असल्याने राजकीय पक्षातील अनेक प्रतिष्ठित मातब्बर उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी उभे होते. ब्रम्हपुरीच्या गुलाबी थंडीत



निवडणूकीचा ज्वर चांगलाच वाढला होता. नगराध्यक्ष पदासाठी काँग्रेस पक्षाकडून योगेश मिसार, भाजपाकडून सुयोग बाळबुद्धे, शिवसेना (उबाठा) कडून मिलींद भणारे, तर बसपा कडून निहाल ढोरे निवडणूकीच्या आख्याड्यात उभे होते. नगराध्यक्ष पदासाठी ०४ तर नगरसेवक पदासाठी ९५ उमेदवार रिंगणात होते. ब्रम्हपुरी नगर पालिकेची निवडणूक चुरशीची झाली. यात नगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीत काँग्रेस व भाजपा पक्षाने मोठ्या ताकदीने प्रचार केला होता. तर तिसऱ्या आघाडीने प्रस्थापितांविरूद्ध दंड थोपाटले होते. मात्र नंतर, तिसरी आघाडी थंडबस्त्यात दिसून आली.

ब्रम्हपुरी नगर परिषदेसाठी जनतेतून थेट नगराध्यक्ष व ११ प्रभागासाठी २३ नगरसेवक निवडून देण्यासाठी ०२ डिसेंबरला मतदान झाले. यात नगराध्यक्ष व २३ नगरसेवकांना निवडून देण्यासाठी एकुण मतदारांपैकी ११३६४ पुरूष तर ११५७२ महिला आपला मताधिकाराचा हक्क बजाविला. ब्रम्हपुरी नगर पालिकेत मतदान करणाऱ्यांमध्ये पुरूषांपेक्षा महिलांची संख्या अधिक असल्याचे दिसून आले. त्यामुळे ब्रम्हपुरी नगर पालिकेचा निकाल महिला ठरविणार आहेत. २१ डिसेंबरला नगर पालिका निवडणूकीचा निकाल असल्यामुळे नागरिकांचे निकालाकडे लक्ष लागले आहे.

# शेतकऱ्याच्या मानेवर व्याघ्र हल्ल्याची टांगती तलवार!

## शेतीची कामे करावी कशी, शेतकरी भयग्रस्त...

ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्यातील वाढती वाघांची संख्या शेतकऱ्यांसाठी कर्दनकाळ ठरत आहे. खरीप हंगाम असो की रब्बी अस्मानी-सुलतानी संकटांमुळे शेतकरी हवालदिल आहेत. वाघाच्या भीतीने शिवारात जाण्याची शेतकऱ्यांची हिंमत होत नसल्याचे चित्र ग्रामीण भागात आहे. ताडोबा व्याघ्र प्रकल्पानंतर सर्वाधिक वाघांची संख्या ब्रह्मपुरी वनविभागात आहे. तालुक्यातील उत्तर आणि दक्षिण वनपरिक्षेत्रात



अनेक गावांतील शेतमजुरांचे जीवनमान वाघाच्या दहशतीमुळे संकटात आले. मजुरी करणाऱ्यांना कामावर जाण्याची भीती सतावते. जंगलातून वारंवार गावात व शिवारात फिरणारा वाघ शेतकऱ्यांची वाट अडवतो. वन विभागातर्फे जंगलात कॅमेरे बसवले असून, वाघाला विभागीय वन अधिकारी सतत ट्रॅप करीत असतात. नरभक्षक वाघांना पिंजरे लावून वाघ पकडण्याचे प्रयत्न वनविभागाकडून सुरू असतात. शासनाच्या क्लिष्ट नियमांमुळे वनविभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना बघ्याची भूमिका घेऊन शांत राहावे लागते. ब्रह्मपुरी वनपरिक्षेत्रात वाघांची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र वन्यजीव-मानव संघर्ष टाळण्यासाठी वनविभाग प्रयत्नशील असतो.

**जंगलालगत असणाऱ्या गावातील नागरिकांनी अंधारात घराबाहेर पडू नये. एकट्याने शेतात जाऊ नये. अशा सूचना वेळोवेळी दिल्या जातात.**

**- कुमार स्वामी, उपवनसंरक्षक, ब्रह्मपुरी वनविभाग**

**वनविभागाने काही वाघांचे स्थलांतर करावे. जंगलालगत असणाऱ्या गावांसभोवताल सौर पथदिवे उभारावे, जाळीचे कुंपण करावे, गावाभोवती छोटी झुडपे ठेवू नये. नियमित गस्त वाढवावी.**

**- प्रमोद चिमुरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य**

### दीड वर्षात ०५ बळी

**वनविभागाच्या माहितीनुसार एप्रिल २०२४ ते २५ सप्टेंबर २०२५ या दीड वर्षात दक्षिण व उत्तर ब्रह्मपुरी क्षेत्रात व वाघांच्या हल्ल्यात दहा घटना घडल्या. यात पाच जण ठार तर पाच गंभीर जखमी झाले. अनेक पाळीव प्राणी जखमी झाले. यात दक्षिण वनपरिक्षेत्र ब्रह्मपुरी येथे सात घटना नोंदवल्या गेल्या असून, दोन जण ठार व पाच जण जखमी झाले. उत्तर वनपरिक्षेत्रातील गणेशपूर पातळी, चिचखेडा व लाखापूर परिसरात तीन जणांचा मृत्यू झाला. दक्षिण वनपरिक्षेत्रात पीडित कुटुंबांना ५० लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. सध्या येथे १८ वाघ असून, त्यात पाच नर, सहा मादी, सहा बछडे व एक प्रौढ वाघ आहे. उत्तर ब्रह्मपुरी वनपरिक्षेत्रात पीडित कुटुंबांना ६० लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. येथे वाघांची संख्या १७ आहे.**




**ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता**

www.bramhapuri samachar.com/bs

मो. 9503100964
मो. 8275715315

संपादकीय...

## सत्ताधाऱ्यांना विरोधक नकोसे..?

नागपूर येथे हिवाळी अधिवेशनाला सोमवारी प्रारंभ झाला. नेहमीप्रमाणे हे अधिवेशन वादळी ठरणार अशी शक्यता सुरुवातीपासूनच दिसत आहे. पण याचे वेगळेपण असे की, १९५२ नंतर प्रथमच विरोधी पक्षनेत्यांविनाच हे अधिवेशन पार पडणार आहे. कारण विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील विरोधी पक्षनेतेपद सध्या रिक्त आहेत. शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांची आमदारकीची मुदत संपल्यामुळे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेतेपद रिक्त आहे. तर विधानसभेत महायुतीमध्ये मतभेद असल्याचा अजब शोध लावत सत्ताधारी पक्षाने विरोधी पक्षनेत्याची अद्याप नेमणूकच केलेली नाही. वास्तविक विरोधी पक्षनेतेपदाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार हा त्या-त्या सभागृहाच्या सभापती किंवा अध्यक्षांचा असतो. त्यादृष्टीने विधानसभेचा निर्णय राहुल नार्वेकर तर विधान परिषदेचा निर्णय प्रा. राम शिंदे हे घेणार आहेत. विरोधकांच्या वतीने या दोन्ही पदांसाठी औपचारिक दावा करण्यात आलेला आहे. पण वरील दोन्ही अध्यक्षांनी त्यावर अद्याप निर्णय घेतलेला नाही. याचे कारण सत्तापक्षाकडूनच त्यासाठी त्यांना हिरवा कंदिल दाखवला गेलेला नाही.

विरोधी पक्षनेता नसल्याने सत्ताधाऱ्यांना कसेही कामकाज रेटून नेता येते. विरोधकांनी कितीही गोंधळ घातला तरीही प्रसंगी त्यांचे निलंबन करून विधेयके मंजूर करता येतात. कोणते व कसेही निर्णय घेतले तरी चालतात, कारण विरोधकांचा आवाज क्षीण व सौम्य आहे हे सत्ताधाऱ्यांना पूर्णपणे ठावूक असते. राज्यात सध्या हेच होत आहे. राज्याच्या तिजोरीवर कर्जाचा डोंगर वाढत आहे. लाडक्या बहिणींना द्याव्या लागणाऱ्या नियमित पैशामुळे इतर योजनांना खीळ बसला आहे. त्यामुळे पुरवणी मागण्या सादर करून सरकारला अडजेस्टमेंट करावी लागते, इकडचा निधी तिकडे वळवून वेळ भागवावी लागते. महायुतीमधील पक्ष, नेते, आमदार कसेही वागले, एकमेकांशी कितीही भांडले तरीही या सगळ्यांचा जाब विरोधकांनी आपल्याला विचारू नये, असेच सत्ताधाऱ्यांना वाटते आहे. विरोधी पक्षनेते नेमले तर नाही म्हटले तरीही त्याचा किमान धाक, दरारा सत्ताधाऱ्यांना सहन करावाच लागतो. ते टाळण्यासाठीच हा अध्यक्षांचा निर्णय आहे, असे सांगून चेंडू त्यांच्या कोर्टात ढकलला जात आहे. पण जेवढे शक्य आहे तेवढे दिवस हा निर्णय लांबणीवर टाकण्याचाच अध्यक्ष व सत्तापक्षाचा प्रयत्न दिसतो आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतरही काँग्रेसला विरोधी पक्षनेतेपद देण्यास अशाच प्रकारे टाळाटाळ करण्यात आली होती.

सरकार मग ते कोणतेही असो, त्यांना असे वाटत असे की, जनतेचा व देशाचा, राज्याचा विकास हा फक्त आपणच करत असतो. आपले विरोधक हे राजकारण करतात व विकासाच्या कामात खीळ घालण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांना दुर्लक्षित करा व कामकाज रेटून न्या, असे धोरण सध्या सुरू आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधी व नंतरही हीच वैचारिक मतभिन्नता राष्ट्रीय राजकारणात कायम आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचे तर सहा कोन तयार झाले आहेत. भारतीय जनता पक्ष, शिंदे गट, उद्धव ठाकरेंची शिवसेना, आता अजित पवार आणि शरद पवार यांचे स्वतंत्र राष्ट्रवादी गट आणि काँग्रेस असे ते गट आहेत. याव्यातिरिक्त इतर राजकीय पक्ष, संघटना व नेत्यांची तिसरी आघाडी आहेच. पण राज्याचे राजकारण सध्या तरी षटकोनामध्ये विभागले असून जो तो नेता, पक्ष एकमेकांना पाण्यात पाहण्याचा प्रयत्न करत स्वतःचे वर्चस्व सिद्ध, महत्व कायम राखण्यासाठी धडपड करतो आहे. सत्ताधारी तसेच विरोधकांचा एकूण पवित्रा अंगावर आले तर थेट शिंगावर घेऊन उचलून दूर फेकून द्या, असा दिसतो आहे. जनता, मतदार याला अक्षरशः वैतागले असले तरीही हे सगळे सहन करण्याशिवाय त्यांच्यासमोर दुसरा पर्यायदेखील उरलेला नाही. एकूणच सध्या देशातील लोकशाही, राजकारणाचा स्तर हा चिंतेचा विषय ठरताना दिसत आहे. पण महाराष्ट्राच्या राजकारणाचा स्तर त्यात भयंकर, धक्कादायक किंवा अतीगंभीर म्हणावा इतपत घसरला आहे. विरोधक हे सत्तापक्षाला अंकूश लावणारे असावेत. पण प्रसंगी विधायक कामात त्यांना सहकार्य करणारेही असावेत. दोन्ही घटक लोकशाहीसाठी गरजेचे आहेत. कारण त्यावरच लोकशाहीच्या मंदिराचा डोलारा उभा आहे.

## एनसीसीचे शौर्य उजळले, कॅडेट देशसेवेस कटिबध्द

### ने.हि. महाविद्यालयातील १० कॅडेट ठरले अग्निवीर



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील एनसीसी युनिट २० महा बटालियन, नागपुर सलग्नित, दहा एन सी सी कॅडेटची भारतीय सैन्यात 'अग्निवीर' म्हणून निवड झाली. एन सी सी कॅडेट मयूर बोरकर, कॅडेट युसुफ चांदीकर, कॅडेट गिरीश मोटघरे, कॅडेट साहिल मेश्राम, कॅडेट प्रसाद अजबले, कॅडेट तेजस बगमारे, कॅडेट तन्मय जुआरे, कॅडेट शुभम रामटेके, कॅडेट वैभव वासेकर आणि एक्स कैडेट सरगम भागडकर यांनी देशसेवेचे स्वप्न पूर्ण करत महाविद्यालयाचा तिरंगा अभिमानाने उंचावला आहे.

सर्व निवड झालेल्या अग्निवीर कॅडेटचा सत्कार आणि शुभेच्छा कार्यक्रम एन सी सी यूनिट तर्फे महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हनून प्रिन्सिपल डॉ. एस. एम. शेकोकर आणि नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सदस्य तथा तरुण उद्योजक गौरवजी भैया यांची विशेष अतिथि म्हनुन उपस्थित लाभली. प्रसंगी प्रा. आनंद भोयर, प्रा. विनोद नरड, कैप्टन अभिजीत परकरवार आणि प्रा. रेवनदास बोरकर यानी कार्यक्रमाला उपस्थित राहून सर्व अग्निवीर कॅडेटचे कौतुक केले आणि सैन्यातील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला एन सी सी चे सर्व कैडेट्स उपस्थित होते. नेवजाबाई भैया हितकारिणी संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांनी सर्व अग्निवीर कैडेट्स चे विशेष अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे संचालन कैडेट प्रियशील चंदनखेड़े यानी केले आणि आभार कैडेट सुहानी देशमुख हिने व्यक्त केले. या उपलब्धीसाठी या तरुण अग्निवीरांचे सर्वत्र कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

## विनयभंग गुन्ह्यातील आरोपीस १ वर्ष कारावासाची शिक्षा

ब्रम्हपुरी/का.प्र.

गावातील महिलेचा हात पकडून विनयभंग केल्याप्रकरणी ब्रम्हपुरी प्रथम श्रेणी न्यायालयाने निकाल देत आरोपीस ०१ वर्ष ०१ महिन्याचा कारावास व एक हजार पाचशे रूपये दंडाची सजा सुनावली आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी महिला ही नाटकातील डॉन्स कार्यक्रम पाहून, स्वतःच्या घरी पाणी नेण्यासाठी आली असता, ब्रम्हपुरी तालुक्यातील मुई गावातील आरोपी रूपेश सोमेश्वर चौधरी वय २२ वर्षे याने २५ नोव्हेंबर २०१६ मध्ये रात्रो १०.४५ वाजता फिर्यादी महिलेचा हात पकडून ओढून विनयभंग केला. फिर्यादी महिलेच्या रिपोर्ट वरून ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३५४, ४४८ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

सादर विनयभंग प्रकरणाचा निकाल ०६ डिसेंबर २०२५ रोजी डी.बी.गुट्टे प्रथम श्रेणी न्यायाधिश यांनी दिला. यात आरोपीस ०१ वर्ष ०१ महिन्याचा कारावास व एक हजार पाचशे रूपये दंडाची सजा ठोठावली आहे. फिर्यादीच्या बाजूने एस.एल.वाघमारे, एस.डी.हटकर हे होते. तर आरोपीच्या बाजूने राजेश डांगे यांनी युक्तीवाद केला. तपासी अधिकारी म्हणून पोहवा अरून पिसे यांनी काम पाहिले.

## ब्रम्हपुरीचा 'लक्ष्मीकांत' चमकला खेलो इंडिया स्पर्धेत



ब्रह्मपुरी/का.प्र.

महात्मा गांधी काशी विद्यापीठाच्या हॉकी टीमने खेलो इंडिया यूनिव्हर्सिटी गेम्स मध्ये उपविजेता स्थान प्राप्त करून सिल्वर मेडल मिळविले. यात विशेष म्हणजे ब्रह्मपुरीचा हॉकीपट्टू लक्ष्मीकांत मनोहर कावळे याचे या स्पर्धेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान राहिले.

ब्रह्मपुरी शहर ही क्रीडा नगरी म्हणून सर्व परिचित आहे. शालेय बालकापासून ते मोठ्यांपर्यंत ने.हि. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर हॉकी खेळ मोठ्या प्रमाणात खेळला जातो. शहरातील ने.ही विद्यालयाचा विद्यार्थी असलेल्या लक्ष्मीकांत याने अनेक स्पर्धांमध्ये क्रिडा कौशल्य दाखवून ब्रह्मपुरीचे नाव लौकिक केले आहे.

### विनोदिनी

रामभाऊ सकाळी पेपर वाचत बसले होते... पहिल्याच पानावरील रशिया-युक्रेन युध्दाची बातमी पाहून मनोमन नाराज झाले.
चिंतित होऊन बायकोला म्हटलं, 'जगभरात जिकडे-तिकडे युध्दजन्य स्थिती आहे... जग तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत होरपळत नष्ट होतं की काय ही भीती आहे आता...'
तर त्यावर त्यांची पत्नी लगेच म्हणाली, 'मग लोणचं करू की नको यंदा...?
मी मेलीने इतकं राबायचं, आणि नंतर खायला कोणीच नाही, असे व्हायचे...!!'

# दुचाकीच्या डिक्कीतून १ लाख ७० हजार रू. लंपास

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील जुगनाळा येथील रहिवासी राकेश भोजराज सहारे यांनी येथील सेंट्रल बँकेतून काढलेले १ लाख ७० हजार रुपये दुचाकीच्या डिक्कीत ठेवले असता, चोराने रक्कम लंपास केली. ही घटना सोमवार, दि. ०८ डिसेंबरला दुपारच्या सुमारास घडली. पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवारी श्वान पथकही बोलावण्यात आले होते.

राकेश सहारे यांनी येथील सेंट्रल बँकेतून १ लाख ७५ हजार रुपयांची रक्कम काढली. आणि या रकमेतून १ लाख ७० हजार रुपये त्यांनी दुचाकीच्या डिक्कीत ठेवले गावाकडे जाण्यास निघाले. वाटेत त्यांना त्यांची दुचाकी पंक्चर असल्याचे लक्षात आल्याने शिवाजी चौकाच्या पुढे आरमोरी रस्त्यावरील एका ऑटो मोबाईलमध्ये त्यांनी दुचाकी लावली. तेव्हा एका लाल जॉकेट घातलेल्या अनोळखी इसमाने राकेश यांना तुमच्या शर्टवर मागून किडे असल्याचे सांगितले. राकेश सहारे यांनी शर्ट काढून झटकल्यानंतर त्यांच्या मानेला खाज सुटली. तेव्हा त्याच इसमाने पाणी देऊन धुवायला मदत केली. थोड्या वेळाने राकेश आपल्या दुचाकीजवळ गेले असता डिक्कीचे लॉक तुटले होते व रक्कम असलेली पिशवी गायब झाली होती.

राकेश सहारे यांच्या तक्रारीवरून पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ठाणेदार प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. याप्रकरणी मंगळवारी श्वान पथकही बोलावण्यात आले होते. अशाच प्रकारची घटना ८ महिन्यांपूर्वी शहरात घडली होती. गुन्हेगार हा एकटा नसून, संघटित टोळी असावी, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

**जल है तो कल है...**

# ने.हि. महाविद्यालयात संत जगनाडे महाराज जयंती संपन्न



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात वारकरी पंथातील संत जगनाडे महाराज जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सर्वप्रथम प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर व अधीक्षक संगीता ठाकरे यांनी प्रतिमेला माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी घोषणा देण्यात आल्या.

त्यानंतर उपस्थित डॉ राजेंद्र डांगे, डॉ असलम शेख, डॉ धनराज खानोरकर, डॉ मोहन कापगते, डॉ रतन मेश्राम, डॉ किशोर नाकतोडे, डॉ सुनिल चौधरी, डॉ युवराज मेश्राम, डॉ पद्माकर वानखडे, डॉ विवेक नागभीडकर, डॉ मिलिंद पठाडे, प्रा बालाजी दमकोंडवार, डॉ अतुल येरपुडे, डॉ कुलजित शर्मा, डॉ हर्षा कानफाडे, प्रा निलिमा रंगारी, प्रा धिरज आतला, पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर, डॉ ज्योती दुपारे, प्रा कोमल ठोंबरे, दत्तू भागडकर, माणिक दुपारे इत्यादींनी संताजी जगनाडे महाराजांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ युवराज मेश्रामांनी केले. यशस्वीतेसाठी समिति प्रभारी डॉ कुलजित शर्मा डॉ. खानोरकर, प्रा. आतला, जगदिश गुरनुले, प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले.

# डॉ. पंजाबराव देशमुख कॉन्व्हेंट येथे पुण्यतिथी कार्यक्रम

## गणवेश, पारितोषिक व पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

ब्रह्मपुरी/प्रतिनिधी

स्थानिक श्री. श्रावणजी बगमारे शिक्षण संस्था ब्रह्मपुरी द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख कन्या कनिष्ठ महाविद्यालय व डॉ. पंजाबराव देशमुख कान्वेंट यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे प्रेरणास्थान स्व.श्रावणजी बगमारे महाजन व स्वर्गीय उमाबाई बगमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मान्यवर अतिथींच्या हस्ते गणवेश वितरण, पुरस्कार वितरण व सन्मानचिन्ह वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .



यानिमित्ताने प्रा .प्रकाश बगमारे संस्था अध्यक्ष यांच्या आजीवन संकल्पना नुसार या २६ व्या स्मृतिदिनी डॉ. पंजाबराव देशमुख कन्या कनिष्ठ महाविद्यालयातील गरीब व होतकरू विद्यार्थिनींना तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदली येथील विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वितरण करण्यात आले. सोबतच सामाजिक क्षेत्रात व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसेवकांचे दरवर्षी सन्मानचिन्ह ,शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात येते. यावेळी चंद्रपूर जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक गोवर्धन टिकले यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन येथोचित सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आला. तसेच महाविद्यालयातील तसेच कॉन्व्हेंटमधील प्राविण्यप्राप्त विद्यार्थी व विद्यार्थिनींना रोख पुरस्कार देण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा . हेमलता बगमारे यांनी तर आभार प्रदर्शन सयाम मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीते साठी सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मेंडकी येथे संविधान दिनी छळ नाटक

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील मेंडकी येथे भारतीय बहुउद्देशीय बौध्द समाज, मातोश्री रमाबाई महिला मंडळ तथा समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने ७७ व्या संविधान दिनाच्या निमित्ताने ‘छळ’ या तीन अंकी नाटकाचे भव्य आयोजन करण्यात आले. नाटकाचे उद्घाटन सुरेशभाऊ चौधरी (म. फुले कला महाविद्यालय, देऊळगाव) यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोदभाऊ चिमूरकर होते.

सहउद्घाटक म्हणून इंजि. मोहनजी नंदेश्वर, उपाध्यक्ष थानेश्वरजी कायरकर माजी पं.स. सदस्य उपस्थित होते. सोबतच रंजितजी कसारे, भावना ईरपाते माजी जि.प. सदस्य, यशवंतजी आंबोरकर उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीत मंगलाताई लोनबले, मंगलाताई ईरपाते, झगडेदासजी रामटेके, सुधाकरजी महाडोरे, राजेंद्रजी आंबोरकर, चिंतामनजी जेल्लेवार, कुंदाताई कोरेवार, माणिकजी ढवळे, बालाजी चहांदे, विनायकजी पाकमाडे, शेंडे वनरक्षक, मेंडकी, दुर्योधनजी चौधरी, सुयोगजी किनाके, रजनी भोयर, भोयरताई, नितीनजी रामटेके आणि जनबंधु सर हजर होते.

# डॉ. रविंद विखार यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



ब्रह्मपुरी/का.प्र.

श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाचे सहा. प्राध्यापक डॉ. रवींद्र विठोबा विखार यांच्या ‘वैज्ञानिक दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास’ या पुस्तकाचे प्रकाशन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे सर, अधिष्ठाता डॉ. विना चिमोटे, मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ.लक्ष्मण साळोक, सुप्रसिद्ध विचारवंत व समाजशास्त्रज्ञ डॉ.सुरेश वाघमारे, विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बि.एम. कराडे, गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.बि. एच.किर्दक, रातुम विद्यापीठाचे समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रदीप मेश्राम, डॉ. के.बि.नायक, डॉ.किशोर राऊत यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

डॉ. विखार यांचे सात पुस्तके प्रकाशित झाले असून बि.ए. प्रथम वर्षाला ‘समाजशास्त्र परिचय’ या पुस्तकाचा गोंडवाना विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. सामान्य संशोधन पद्धती भाग एक व भाग दोन क्रमिक पुस्तक म्हणून गोंडवाना विद्यापीठाच्या बीए अंतिम वर्षाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेले आहेत. डॉ. रवींद्र विखार हे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ बालभारती पुण्याचे सदस्य असून विदर्भ मराठी समाज समाजशास्त्र परिषदेचे सचिव म्हणून कार्यरत आहेत .त्यांची ६० हून अधिक संशोधन पेपर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत प्रकाशित करण्यात झालेले आहेत.

**ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता**
www.bramhapurisamachar.com/bs
**या वेबसाईटवर लॉगीन करा...**

# मनगटात बळ असेल तर विरोधी बाकावरूनही विकास शक्य - आम. वडेट्टीवार



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपूरी मतदारसंघांचा लोकप्रतिनिधी म्हणून मागील दहा वर्षांपासून प्रतीनीधीत्व करत असतांना कधी अल्प काळ सत्तेत तर दीर्घकाळ विरोधी बाकावर होतो. मात्र विरोधी बाकावर बसून देखील ब्रम्हपूरी मतदारसंघांच्या विकासासाठी निधीची कमतरता कधीच पडु दिली नाही. कोट्यवधी रुपयांची विकासकामे मतदारसंघात पुर्णत्वास आणली. कारण मनगटात बळ असेल विरोधी बाकावर बसुनही विकास करता येतो, असे प्रतिपादन विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले.

ब्रम्हपूरी तालुक्यातील चिचखेडा व पाथरी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी मंचावर बाजार समितीचे सभापती प्रभाकर सेलोकर, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमुरकर, माजी पं.स.सदस्य थानेश्वर कायरकर, महीला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष मंगला लोनबले, सरपंच संजना घुटके, उपसरपंच लोकेश चौके, वांद्रा उपसरपंच गुरुदेव वाघरे, पं.स. तांत्रिक अधिकारी रंजीत कसारे, कुडबा माजी सभापती मनोहर गजबे, उपसरपंच सुरेश ठिकरे, पोलिस पाटील रणवीर ठाकरे, भास्कर राऊत, सुधीर पंदिलवार यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पार पडलेल्या विकासकामांमध्ये पाथरी गणेशपुर येथे बौध्द समाज मंदिर लोकार्पण (१५ लक्ष), चिचखेडा येथे नवीन ग्रामपंचायत भवन लोकार्पण (२५ लक्ष), माणिकादेवी समाज भवन लोकार्पण (२० लक्ष), नवीन अंगणवाडी इमारत लोकार्पण (१५ लक्ष), जिल्हा परिषद शाळेत नवीन वर्गखोली लोकार्पण (२० लक्ष), या कामांचा समावेश आहे.

# एलएमबी पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी येथे

# Fireless Cooking Activity



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये दि. २९ नोव्हेंबर २०२५ ला Fireless Cooking Activity घेण्यात आली. या Activity मध्ये विद्यार्थ्यांनी आपआपल्या घरून Fireless Cooking चे वेगवेगळे साहित्य आणले होते.

विना अन्न शिजविता स्वत: काहीतरी बनवून खाणे हा या ॲक्टिव्हिटीमागील उद्देश होता. सोबतच घरातीलच खाण्याच्या साध्या-साध्या वस्तु वापरून ड्रायफुट्स लड्डू, तिळाचे लड्डू, भेल, काला, सॅन्डविच, फळापासून फुट्स केक, दडपे पाहे, मोड आलेले कडधान्य, इ. सोपे सोपे पदार्थ विद्यार्थ्यांनी बनवायला शिकावे व पालकांना त्रास देऊ नये. मुलांनी ही Activity फार उत्साहात साजरी केली.

या कार्यक्रमाप्रसंगी स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका मॅडम उपस्थित होते. प्रि-स्कुलच्या सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपला मोलाचा प्रतिसाद देऊन ही ॲक्टिव्हिटी उत्साहात पार पाडली.

# ट्विंकल इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थीनींचे खेलो इंडिया स्पर्धेत यश

नागभीड/प्रतिनिधी

नागपूर येथील क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आलेल्या 'खेलो इंडिया किक



बॉक्सिंग' स्पर्धेत ट्विंकल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करीत २ सुवर्ण व १ रौप्य पदक पटकावून स्कुलचा नावलौकीक केला.

या स्पर्धेत स्कुलच्या साक्षी गायकवाड हिने ५४ किलो वजन गटात सुवर्णपदक, रेणुका चौके हिने ४५ किलो वजन गटात सुवर्ण तर श्रेया सरपाते हिने रजत पदक प्राप्त केले. या तिन्ही विद्यार्थिनींची भारतीय स्तरावरील साउथ झोन स्पर्धेसाठी निवड झाल्याने शाळा आणि संस्थेचा गौरव अधिक वाढला आहे.

या उत्कृष्ट कामगिरीबद्दल समिधा सेवा संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर, सचिव अजय काबरा, प्राचार्य शुभांगी पोहेकर, मुख्याध्यापिका संगीता नारनवरे यांनी विद्यार्थिनींचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

# ब्रम्हपुरीत संत जगनाडे महाराज जयंती साजरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील भवानी वॉर्डातील महादेव मंदिराच्या प्रांगणात संत शिरोमणी श्री जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भवानी वॉर्डातील महादेव मंदिराच्या प्रांगणात राजेंद्रजी ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली, डॉ. सतीश कावळे, प्रा. रवींद्र विखार, भास्करराव कावळे, डॉ. प्रभूदास चिलबुले, सुयोग बालबुध्दे, मनिषा बंडे, सुरेश करंबे, मनोज कावळे, राजेंद्र हटवार यांच्या उपस्थितीत जयंती सोहळा पार पडला. याप्रसंगी संत जगनाडे महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यात आला.

कार्यक्रमाचे संचलन राकेश पडोळे यांनी तर आभार भाऊराव कावळे यांनी मानले. हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी सुधीर पडोळे, रोशन पडोळे, गरुड पडोळे, सुरेश कावळे, विजय शिवणकर, वाल्मीक जांभूळकर, प्रेमलाल भुरे, सचिन जिभकाटे, महेश पडोळे, नागेश पडोळे, अमोल हटवार, मुकेश हटवार, अजय हटवार व वॉर्डातील समाज बांधव यांनी सहकार्य केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सह. पतसंस्थेत महामानवास अभिवादन



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय नागरी सहकारी पतसंस्थेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मोमबत्ती, अगरबत्ती प्रज्वलित करून व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अशोक रामटेके, सचिव प्रभाकर रामटेके, संचालक सुधीर अलोने, आसाराम बोदेले, जगदीश मेश्राम, डॉ.विनोद नागदेवते, लकी फेरवानी, मॅनेजर शुभम शेंडे, कर्मचारी आनंद हुमणे, धम्मदीप चहांदे, आनंद गणवीर आदी उपस्थित होते.

# मतदान यंत्राच्या सुरक्षिततेकरिता ब्रम्हपुरी न.प.मध्ये त्रि-स्तरीय सुरक्षा प्रणाली

ब्रह्मपुरी/का. प्र.

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी एकूण ३६ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत व उत्साहाच्या वातावरणात यशस्वीरित्या पार पडली. निवडणूक प्रक्रिया दरम्यान कोणतीही अनुचित घटना घडली नाही. मतदान प्रक्रिया संपल्यानंतर, सर्व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (EVMs) नियमानुसार स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आली असून, ती कायदेशीर प्रक्रियेनुसार सील करण्यात आली आहेत. मतदान यंत्रांच्या सुरक्षिततेसाठी त्रि- स्तरीय सुरक्षा प्रणालीचा अवलंब प्रशासनाच्या वतीने करण्यात आला आहे.

याबाबत दिनांक ०३ डिसेंबरला नगरपरिषद कार्यालयात बैठक पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी सतीश मासाळ यांनी सर्व उमेदवार व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांना नगर परिषद कार्यालयात पार पडलेल्या बैठकीस बोलविले होते. सदर बैठकीत निवडणूक निर्णय अधिकारी सतीश मासाळ यांनी उपस्थित सर्व उमेदवार व राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांना मतमोजणी, स्ट्राँग रूम सुरक्षा व्यवस्था, आचारसंहिता याबाबत यथोचित माहिती दिली. मतदान यंत्रे स्ट्राँग रूम मध्ये ठेवण्यात आले असून स्ट्राँग रूमच्या सर्व परिसरात ३ स्तरीय सुरक्षा देण्यात आलेली आहे. त्यातील पहिला स्तर हा राज्य राखीव दलाच्या नियंत्रणात असून त्यामध्ये इतर अनधिकृत व्यक्तींना प्रवेश बंदी आहे. दुसऱ्या स्तरामध्ये विभागातील पोलीस दलाची नियुक्ती करण्यात आलेली असून तिसऱ्या स्तरामध्ये स्थानिक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. स्ट्राँग रूमचा संपूर्ण परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीत असून सीसीटीव्हीचे संपूर्ण नियंत्रण राज्य राखीव दलाकडे सोपविण्यात आले आहे.

स्ट्राँग रूमचे सील योग्य स्थितीत असल्याची खातरजमा करण्याकरीता मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे, नायब तहसीलदार महानंदा मडावी व लिना बोबाटे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच मतमोजणी दिनांक २१ डिसेंबर २०२५ पर्यंत उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना स्ट्राँग रूमची २४/७ पाहणी करणे करिता व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**वाचाल तर वाचाल..**

# मोर्चासंदर्भात ब्रम्हपुरीत आयटकचा मेळावा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण योजने अंतर्गत महाराष्ट्रात कार्यरत एक लाख ७२ हजार स्वयंपाकी तथा मदतनीस गेल्या २० ते २५ वर्षा पासून मासिक २५०० रू.इतक्या तुटपुंज्या मानधनात काम करत आहेत. मिळणारे मानधन सुध्दा नियमित मिळत नाही त्यामुळे शालेय पोषण आहार कर्मचारी यांच्यावर उपास मारीची पाळी आली आहे. त्यामुळे ब्रम्हपुरी तालुक्यातील संतप्त झालेल्या शापोआ महिलांनी एकत्र येत आयटक राज्य सचिव विनोद झोडगे यांच्या मार्गदर्शनात कृषी उत्पन्न बाजार समिती जवळील मंदिरात मेळाव्याचे आयोजन करून पुढील आंदोलनाची दिशा ठरविली.

शापोआ कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या घेऊन १० डिसेंबर २०२५ रोजी राज्यव्यापी कामबंद आंदोलन करून नागपूर हिवाळी अधिवेशन वर बेमुदत मुक्कामी महामोर्चा सकाळी ११ वाजता चाचा नेहरू बालभवन शुक्रवारी तलाव येथून काढणार असल्याचे कॉ.विनोद झोडगे यांनी सांगितले.

यावेळी मेळाव्यात संघटनेच्या जिल्हा सचिव कॉ.वनिता कुंटावार, पत्रकार प्रशांत डांगे, तालुका अध्यक्ष कुंदा कोहपरे, सचिव जयघोष दिघोरे, नागभीड तालुका अध्यक्ष निर्मला गुरनुले यांनीही मार्गदर्शन करत मानधन वाढ जी आर निघाल्या शिवाय माघार घ्यायची नाही, अशी स्पष्ट भूमिका मांडली आहे. मेळाव्या करिता ब्रम्हपुरी व नागभीड तालुक्यातील शेकडो शालेय पोषण आहार कर्मचारी उपस्थित होते.

✻✻✻✻✻✻

# जिल्ह्यात पदे रिक्त असतांना डॉक्टरांना पुणे कोकणात पदोन्नती

ब्रम्हपुरी/का.प्र.

विभागीय संवर्ग वाटपात नागपूर विभागाला सुट न देता कोकण विभाग व पुणे विभागात पदोन्नती देण्यात आले. त्यामुळे चंद्रपूर-गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यातील १५ वैद्यकीय अधिकाऱ्यांना विशेष बाब म्हणून विभागीय संवर्ग वाटपात सुट देण्यात यावी आणि पदोन्नती पदस्थापना आहे, त्याच जिल्ह्यात देण्याची मागणी वैद्यकीय अधिकारी महासंघ संघटनेकडून मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

विदर्भातील नागपूर विभागात ग्रामीण भागात वैद्यकीय अधिकाऱ्यांचे शेकडो पदे निरंतर रिक्त आहेत. गेल्या ५० वर्षापासून बीएएमएस वैद्यकीय अधिकारी आरोग्य विभागात अनेक ठिकाणी अतिदुर्गम नक्षलग्रस्त कठीण डोंगराळ भागात अविरत निरंतर अखंड आरोग्य सेवा देत आहेत. ग्रामीण भागात जिथे एमबीबीएस झालेले विद्यार्थी आरोग्य सेवा द्यायला नकार देतात, तिथे बीएएमएस विद्यार्थी आरोग्य सेवा देत आहेत. राज्यात ३० वर्षापासून बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांचे आस्थापना, पदोन्नती विषय प्रलंबित आहेत.

२००९ ला अस्थायी वैद्यकीय अधिकारी १३०० पैकी १२०० एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांचे समावेशन झाले. परंतु, फक्त ७९ बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांचे गट अ मध्ये समावेशन झाले. गेल्या ३० वर्षात शासन-प्रशासनाकडून बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांना कधीही पदोन्नतीत देण्यात आलेली नव्हती. तीन वर्षापूर्वी काही लोकांनी न्यायालयात जाऊन पदोन्नतीचा हक्क मागितला. २०२३ नंतर पहिल्यांदाच राज्य आरोग्य प्रशासनाकडून बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याकरिता शासकीय प्रक्रिया सुरु करण्यात आली.

दोन वर्षाच्या कठीण संघर्षांतून पदोन्नती प्रक्रिया अंतिम टप्प्यावर असून आरोग्य भवन मुंबई येथे १९६ बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदोन्नती प्रक्रियेची मुलाखत पार पडली. पडली. परंतु, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यातील दुर्गम भागातील सेवारत डॉक्टरांची पदोन्नती पुणे व कोकण विभागात देण्यात आल्याने डॉक्टरांची अडचण झाली आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समताधिष्ठित समाजरचनेसाठी झटले

## प्राचार्य डॉ. शेकोकर : महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम



ब्रह्मपुरी/का.प्र.

'स्वातंत्र्य, समता,बंधुता आणि न्यायावर आधारित राज्यघटना बाबासाहेबांनी मोठ्या कष्टाने निर्माण केली. बहुजनांच्या उत्थानासाठी आणि एकंदरीत स्त्रीयांच्या हक्कासाठी शेवटपर्यंत ते लढत राहिले, कारण बाबासाहेबांना समताधिष्ठित समाजरचना अभिप्रेत होती', असे विवेचन प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त बोलत होते.

सर्वप्रथम प्राचार्य डॉ शेकोकर, प्रा मेजर विनोद नरड यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले. यानंतर बुद्धवंदना घेण्यात आली. उपस्थित डॉ राजेंद्र डांगे, डॉ रेखा मेश्राम, डॉ धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ किशोर नाकतोडे, डॉ रतन मेश्राम, अधीक्षक संगीता ठाकरे, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ युवराज मेश्राम, डॉ योगेश ठावरी, डॉ सुनिल चौधरी, डॉ वर्षा चंदनशिवे, डॉ अरविंद मुंगोले, डॉ कुलजित शर्मा, डॉ हर्षा कानफाडे, डॉ दर्शना उराडे, डॉ अतुल येरपुडे, प्रा रुपेश वाकोडीकर, प्रा धिरज आतला, पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर, डॉ दुपारे मॅडम, प्रा अजय खोब्रागडे, प्रा मेंगरे, प्रा सुरेखा बगमारे, सुषमा राऊत, दतू भागडकर, निनावे, शशिकांत माडे इत्यादींनी पुष्प वाहून बाबासाहेबांना अभिवादन केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ युवराज मेश्राम तर आभार प्रदर्शन डॉ धनराज खानोरकर यांनी केले. यशस्वीतेसाठी जगदिश गुरनुले, ढोरेंनी सहकार्य केले.

**... QUOTES ...**

"When I'm dead, do not declare a holiday. Insted, work a day extra."
- Dr. APJ Abdul Kalam

**चारोळी**

देवळातल्या दानपेटीतून
त्याने पैसे काढले, एटीएम समजून...
देवानेही त्याला माफ केले,
कापून घेतला व्हॅट समजून...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# रणरागिणी राणी लक्ष्मीबाई यांची जयंती एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये साजरी



ब्रम्हपुरी/का. प्र.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील वीरांगणांपैकी एक असलेल्या झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची जयंती दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी बुधवारला एल. एम. बी. पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी येथे उत्साहात साजरी करण्यात आली.

राणी लक्ष्मीबाईंचा जन्म १९ नोव्हेंबर १८२८ रोजी वाराणसी येथे मोरोपंत तांबे यांच्या घरी झाला. ब्रिटीशांनी 'दत्तक विधान नामंजूर' (Doctrine of Lapse) या धोरणानुसार झाशी संस्थान खालसा करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा राणींनी 'मी माझी झाशी देणार नाही', अशी गर्जना केली आणि ब्रिटीशांविरूध्द लढा पुकारला. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी अभूतपूर्व शौर्य दाखविले. घोड्यावर बसून स्वत:च्या छोट्याशा मुलाला पाठीशी बांधून त्या लढल्या. याप्रसंगी स्कुलचे प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी यांनी राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. कार्यक्रमात स्वरदा हेमराज मुंगूलमारे या विद्यार्थीनीने राणी लक्ष्मीबाई यांची वेशभूषा धारण करून थोडक्यात त्यांच्या जीवन परिचयावर प्रकाश टाकला. 'मी माझी झाशी देणार नाही' या तिच्या वाक्यातून स्वातंत्र्याविषयीची तळमळ विद्यार्थ्यांमध्ये जागृत केली. तसेच अर्णिका परशूराम कावळे या विद्यार्थीनीने राणी लक्ष्मीबाईच्या बलिदानातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन चैतन्य किशोर अनोले व यथार्थ कपिल अन्नल्देवार या विद्यार्थ्यांनी केले. अशाप्रकारे राणी लक्ष्मीबाई यांच्या बलिदान व शौयगाथा यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...
: कार्यालय पत्ता : गाडगे बाबा स्मारकासमोर, विद्यानगर, ब्रम्हपुरी
: अंक व जाहिरातींसाठी संपर्क : महेश पिलारे मो. ९५०३९००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७७५३९५
अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs


# तस्करांच्या तावडीतून २० जनावरांची सुटका

## पिकअप वाहनासह २४ लाखांचा मुद्देमाल जप्त



ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कत्तलीसाठी जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करीत २० जनावरांची सुटका केली. या कारवाईत दोन पिकअप वाहनांसह एकूण २४ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सोमवार, ८ डिसेंबरला स्थानिक गुन्हे शाखेच्या मिळालेल्या पथकाला माहितीनुसार, ब्रह्मपुरी हद्दीत नाकाबंदी करण्यात आली. पथकाने दोन पिकअप वाहने थांबवून तपासणी केली असता वाहनात ६ गोवंश आढळून आले. वाहनचालकांची विचारपूस केली असता आणखी १४ जनावरे बांधून असल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून एकूण २० गोवंशांची सुटका केली. आरोपी मिलिंद कोवे (रा. उदापूर, ता. ब्रह्मपुरी), अफसर अली सय्यद (रा. ब्रह्मपुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपींकडून १८ लाख रुपये किंमतीची दोन पिकअप वाहने, ६ लाख रुपये किंमतीची ६ जनावरे असा एकूण २४ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, पोलिस हवालदार चुनारकर, अजित शेंडे, नितेश जयंत महात्मे यांनी केली.

# प्राचार्य डॉ. जयदेव देशमुख यांचे दुःखद निधन



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी निवासी आणि मुळचे चिखलपहेला, जि. भंडारा येथील सध्या वनश्री महाविद्यालय, कोरची, जि. गडचिरोली येथे प्राचार्य म्हणून कार्यरत असलेले व पूर्वाश्रमीचे आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज येथे १९९१ ते २०२४ पर्यंत ३३ वर्षे वाणिज्य शाखेतील ज्येष्ठ, सुस्वभावी, अभ्यासू, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक ते काय.प्राचार्य म्हणून नावलौकिक प्राप्त झालेले, गोंडवाना विद्यापीठातील दोनदा विद्याशाखा सदस्य, संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. जयदेव पुंडलिक देशमुख यांचे शनिवारी दीर्घ आजाराने निधन झाले.

त्यांचा अंत्यविधी त्यांचे मुळगाव चिखलपहेला, जि. भंडारा येथे रविवारला सकाळी पार पडले.

आचार्य पदवीचे संशोधन मार्गदर्शक म्हणून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक संशोधकांनी आचार्य पदवी संपादन केली.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404